" अंतरी पेटवू ज्ञानज्योत "

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

जा.क्र.।- उमवि\5\पु-66\ 7956 \98 दिनांक।- 9\10\1998

प्रति,

मा.अध्यक्ष,

त्रिमूर्ती शिक्षण संस्था,

साक्री, जि.धुळे.

विषय :- शैक्षणिक वर्ष 1998-99 पासून साक्री, जि.धुळे येथे कला व विज्ञान महाविद्यालय सुरु करणेस परवानगी...

संदर्भ :- महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांचे पत्र क्रमांक :- एनजीसी-3598\ नमवि (81\98)\मशि-3, दि.19\8\1998

महोदय,

साक्री, जि.धुळे येथे कला व विज्ञान विद्याशाखेचे महाविद्यालय सुरु करणेस शासनाने संदर्भिय पत्रान्वये दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने विद्यापीठाची संलग्नता देण्यासंदर्भात, तपासणी करुन अहवाल सादर करण्यासाठी विद्यापीठाद्वारा नियुक्त केलेल्या स्थानिक चौकशी समितीच्या अहवालावर महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, 1994 च्या कलम 83(1) व (3) नुसार मा. विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार व मला प्राप्त झालेल्या आदेशावरुन आपणास कळविण्यात येते की, खालील अटींची, तसेच अहवालात नमूद त्रुटी\अटींची पूर्तता करण्याचे अटीवर आपल्या संस्थेस शैक्षणिक वर्ष 1998-99 पासून साक्री, जि.धुळे येथे फक्त कला विद्याशाखेचे महाविद्यालय त्यासमोर दर्शविलेल्या विषयांसह सुरु करण्यास महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम 1994 च्या कलम 83(4) नुसार संलग्नीकरण देण्यात येत आहे. संलग्नीकरण देण्यात येणा-या अभ्यासक्रमाचे वेळोवेळी नुतनीकरण करणे आवश्यक राहील.

कला विद्याशाखा :- प्रथम वर्ष कला :- सक्तीचे इंग्रजी, मराठी, हिंदी, इतिहास, भुगोल, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, संरक्षणशास्त्र, शिक्षणशास्त्र व राज्यशास्त्र.

( कृपया मागे पहावे )

Scanned by CarbonScanner

अटी :-

1) महाविद्यालयाने अध्यादेश 172-H नुसार निधीची गुंतवणूक करावी व हा निधी विद्यापीठाच्या पूर्व परवानगीशिवाय काढला जाणार नाही असे हमीपत्र विद्यापीठास सादर करावे.

2) ग्रंथालयात अजून 10,000/- ते 15,000/- रुपयांची पाठ्यपुस्तके व संदर्भग्रंथ खरेदी करावीत. नियतकालिके व वृत्तपत्रे सुरू करावीत.

3) खरेदी केलेल्या जागेवर एक वर्षाच्या आंत महाविद्यालयाची इमारत बांधकाम व क्रिडांगण तयार करावे.

4) महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम 1994 मधील कलम 85 (1) नुसार स्थानिक व्यवस्थापन समिती गठीत करण्यात यावी.

कळावे,

आपला विश्वासू,

उप कुलसचिव (सलग्नता)

सोबत : - स्थानिक चौकशी समिती अहवालाची प्रत

प्रत माहितीसाठी सस्नेह रवाना :-

1. मा. सचिव, उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-32.
2. मा.शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण अनुदान), महाराष्ट्र राज्य, शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, पुणे -1.
3. मा. सह संचालक, ( उ.शि. ), जळगाव विभाग, जळगाव.
4. सर्व प्रशासकिय अधिकारी, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.
5. मा.प्राचार्य, त्रिमुर्ती शिक्षण संस्था संचलित कै. विमलबाई उत्तमराव पाटील कला महाविद्यालय, साक्री, जि.धुळे.

----

Shaikh/AC/Act61098/